# विद्यमान ५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वर्धा जि.वर्धा यांचे न्यायालय

**संं.फौ.खटला क्र. ४५३/२०२३** **निशाणी क्रमांक ३**

(CNR : MHWR03-000644 2023)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याची तारीख | : | ०३.०२.२०२३ |
| २) | गुन्हा नोंद झाल्याची तारीख | : | ०३.०२.२०२३ |
| ३) | तक्रारकर्ता, नाव व पत्यासह | : | महाराष्ट्र शासनातर्फे पोलीस ठाणे अधिकारी, रामनगर, वर्धा |
| ४) | आरोपीचे नाव | | **प्रफुल देविदासजी वाढई**<br>वय–२५ वर्षे, व्यवसाय–पदार्थ बनविणे<br>रा. आलोडी, वर्धा तालुका जि.वर्धा. |
| ५) | गुन्हयाचा तपशील | : | |

तुम्ही दिनांक ०३.०२.२०२३ रोजी १५:०० ते १५.१५ वाजताच्या दरम्यान मौजा– आर्वी नाका, पावडे चौक, वर्धा येथे रोडलगत तुम्ही तुमच्या दुकानात मानवी जीवन धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्ती ला दुखापत किं वा क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदकारपणे व हयगयीने गँस सिलेंडरवर तेलाची कढई ठेउन ज्वालाग्राही पदार्थांबाबत कृती केली व संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करण्यास हयगय केली व त्याप्रमाणे **तुम्ही भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २८५** चा अपराध केला असून तो त्याच कलमान्वये दंडनीय आहे व तो माझे कार्यक्षेत्रात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र.१ | : | तुम्हाला चालानाची प्रत मिळाली आहे काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न क्र.२ | : | तुम्हाला गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगीतला, तो समजला काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न क्र.३ | : | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | : | होय. मला गुन्हा कबुल आहे. |

आरोपीची सही

--------------

समक्ष

LATA HANMANT JADHAV

Digitally signed by LATA HANMANT JADHAV
Date: 2023.02.14 11:53:14 +0530

**[ एल. एच. जाधव ]**

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वर्धा, जि.वर्धा.

वर्धा.
दिनांक : ११-०२-२०२३

आरोपीने दाखल केलेली पुरसीस पाहीली व त्याने त्याप्रमाणे गुन्हा कबूल केल्याचे सांगितले. वरील बाब लक्षात घेता आरोपीने स्वमर्जीने गुन्हा कबूल केल्याचे दिसते. आरोपीची आर्थीक परिस्थिती व कौटुंबिक जबाबदारी लक्षात घेता, त्याला जास्तीत जास्त शिक्षेतून काही मुभा देणे योग्य वाटते. त्यामुळे, मी या कामी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम-२५२ प्रमाणे **भारतीय दंड विधान, १८६० चे कलम-२८५** खालील शिक्षापात्र गुन्हयाकरीता **रक्कम रु.३००/-** दंड ठोठावण्यात येत आहे, आरोपीने दंड न भरल्यास पाच दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

LATA HANMANT JADHAV

Digitally signed by LATA HANMANT JADHAV
Date: 2023.02.14 11:53:20 +0530

**[ एल. एच. जाधव ]**

५ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
वर्धा, जि.वर्धा.

वर्धा.
दिनांक : ११-०२-२०२३